# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:12.09.2025** **वार:शुक्रवार**

1. नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांचा राज्यपालपदाचा राजीनामा, तात्पुरता कार्यभार आचार्य देवव्रत यांच्याकडे
2. राज्यात एक लाख नऊ हजार कोटींचे उद्योजकता गुंतवणूक करार झाल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती, रोजगाराच्या 47 हजार संधी निर्माण होणार,
3. पंतप्रधानांच्या 75व्या वाढदिवसानिमित्त देशभरात सेवा पंधरवडा साजरा होणार, पुण्यात वैशिष्ट्यपूर्ण ड्रोन शोचं आयोजन, आणि
4. भारतीय सैन्यातील महिला अधिकाऱ्यांच्या महत्त्वाकांक्षी जलपरिक्रमेला मुंबईतून प्रारंभ

**<u>प्रभारी-राज्यपाल-मुंबई</u>**

सी. पी. राधाकृष्णन यांची उपराष्ट्रपतीपदी निवड झाल्यामुळे त्यांनी काल महाराष्ट्राच्या राज्यपाल पदाचा राजीनामा दिला. आता गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्याकडे महाराष्ट्राच्या राज्यपालपदाचा अतिरिक्त कार्यभार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सोपवला आहे. दरम्यान नवनिर्वाचित उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आज पद आणि गोपनीयतेची शपत घेणार आहेत.

**<u>गुंतवणूक-मुख्यमंत्री</u>**

'महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम आहे. नुकतेच राज्यात एक लाख नऊ हजार कोटींचे उद्योजकता गुंतवणूक करार करण्यात आले असून त्यातून 47 हजार तरुणांना रोजगार मिळणार आहेत', अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईमध्ये दिली. इंडिया-ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स ग्लोबल फोरम लिडर्स मीट आणि मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसह झालेल्या गोलमेज परिषदेनंतर ते बोलत होते. मुख्यमंत्री म्हणाले...

**गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्राने जी आघाडी घेतली आहे. ती आघाडी कायम ठेवत पुन्हा एकदा आम्ही 1 लाख 8 हजार 599 कोटी रुपयांचे करार केलेले आहेत. ज्यातनं जवळपास 47 हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. कोकण विभागामध्ये दोन डेटा सेंटर चे करार केले आहेत. ज्यामध्ये एमजीएसए रियल्टीज 5 हजार कोटी रुपये गुंतवणार आहे डेटा सेंटर मध्ये आणि लोडा डेव्हलपर्स हरित एकात्मिक डेटा सेंटर मध्ये 30 हजार कोटी रुपये गुंतवणार आहेत. एकूण 35 हजार कोटींच दोघांची गुंतवणूक आहे. सोळा हजार लोकांना यातून रोजगार मिळणार आहे.**

**<u>मुख्यमंत्री-मुंबई</u>**

'आपले सरकार' या संकेतस्थळाची लोकाभिमुख, सुधारित आवृत्ती 2 ऑक्टोबरपर्यंत सुरू करा. इतर विविध संकेतस्थळांवर उपलब्ध असलेल्या शासनाच्या सेवा आणि योजना या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्या, असे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत एका बैठकीत दिले.

**<u>मुख्यमंत्री</u>**

हैदराबाद गॅझेटियरचा शासननिर्णय ओबीसी समाजाच्या आरक्षणाला बाधा पोहोचवत नसल्याचा पुनरुच्चार मुख्यमंत्र्यांनी केला आहे. यामध्ये कुठेही सरसकट हा शब्द वापरला नसल्याचं ते म्हणाले. शासननिर्णयाविरोधात ओबीसी नेते न्यायालयात दाद मागणार असल्याच्या प्रश्नावर बोलतांना मुख्यमंत्र्यांनी या सर्व नेत्यांना हा शासननिर्णय पुन्हा एकदा नीट वाचण्याचं आवाहन केलं.

**<u>सेवा पंधरवडा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीतर्फे या महिन्याच्या 17 तारखेपासून देशभरात सेवा पंधरवडा आयोजित करण्यात येणार आहे. काल नवी दिल्लीतील पक्ष मुख्यालयात पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव यांनी

ही माहिती दिली. हा सेवा पंधरवडा महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीपर्यंत, दोन ऑक्टोबरपर्यंत सुरू राहणार आहे. या काळात देशभर विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**मुरलीधर मोहोळ**

पुण्यातही या निमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधानांच्या वाढदिवसाच्या पूर्वसंध्येला म्हणजे 16 सप्टेंबर रोजी पुण्यात, आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त अशा ड्रोन शोसह दिव्यांग सहाय्यता शिबीर आणि संगीत रजनीचं आयोजन करण्यात आलं आहे. केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी बोलताना मोहोळ म्हणाले.....

**माननीय मोदीजींचं हे पंच्याहत्तरावं जन्मवर्ष आहे त्याबद्दल या शहरातील पंच्याहत्तर हजार विद्यार्थ्यांकडून आम्ही त्यांना शुभेच्छापत्र लिहून घेऊन ते पाठवण्याची व्यवस्था करणार आहे. विद्यार्थ्यांनाही आपल्या देशातील प्रधानमंत्र्यांना एका पोस्ट कार्डवरतीचे शुभेच्छा संदेश देण्याची या निमित्तानं संधी उपलब्ध होणार आहे आणि याच्यासोबत एक महत्त्वाचा खूप चांगला कार्यक्रम ज्याचं एक आकर्षण खूप मोठं राहील माननीय मोदीजींच्या नेतृत्वाखालील अकरा वर्षाच्या कामाची एक रूपरेषा असेल आणि विकसित भारताचा संकल्प म्हणून याच्यावरती आधारित एक चाळीस मिनिटांचा ड्रोन लाईट शो सप महाविद्यालयाच्या मैदानावरती आपण आयोजित करतोय मला असं वाटतं की किंबहुना महाराष्ट्रामध्ये पहिल्यांदाच असा ड्रोन लाईट शो होतोय.**

**अजित पवार**

राज्यासह देशातील लाखो भाविकांचं श्रद्धास्थान असलेल्या अष्टविनायकांच्या मंदिर परिसरात सुरु असणारी विकासकामं वेळेत आणि दर्जेदार पध्दतीनं पूर्ण करण्यात यावीत. असे आदेश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल दिले. या संदर्भात मुंबईत झालेल्या आढावा बैठकीत ते बोलत होते. अष्टविनायक मंदिर विकास आराखडा भाविकांना दर्जेदार सोयी देण्याबरोबरच महाराष्ट्रातील पर्यटनवाढीसह अर्थव्यवस्थेला नवं बळ देणारा ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**वीज**

वीज पुरवठा आणि एकूणच ऊर्जा क्षेत्रातील कामगिरीत महाराष्ट्राने बाजी मारली आहे. देशात पश्चिम विभागातील राज्यांमध्ये महाराष्ट्राने याबाबतीत अव्वल स्थान पटकावलं आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याचा ऊर्जा विभाग, या क्षेत्रात कार्यरत कंपन्या, विविध यंत्रणांचं तसंच राज्यातील वीज ग्राहकांचं अभिनंदन केलं आहे.

**आयएनएसव्ही त्रिवेणी**

लष्कर, नौदल आणि वायू दलातल्या महिला अधिकाऱ्यांच्या समुद्र प्रदक्षिणेला काल मुंबईच्या ऐतिहासिक गेट वे ऑफ इंडिया इथून सुरुवात झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी दूरस्थ पद्धतीनं IASV त्रिवेणी या शिडाच्या नौकेवरच्या मोहिमेला रवाना केलं. सैन्यदलप्रमुख जनरल अनिल चौहान, तसंच देशाच्या तिन्ही सशस्त्र दलांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. याविषयी अधिक जाणून घेऊ या आमच्या प्रतिनिधीकडून...

**देशाच्या तिन्ही सशस्त्र दलांच्या महिला अधिकाऱ्यांच्या चमूनं समुद्री जगप्रदक्षिणेला जाण्याची ही पहिलीच वेळ आहे. या चमूत लष्कराच्या पाच, नौदलाच्या एक आणि हवाई दलाच्या चार अधिकाऱ्यांचा समावेश आहे. नऊ महिन्यांच्या या प्रदीर्घ प्रवासादरम्यान हा चमू दोनवेळा विषुववृत्त पार करेल, तसंच केप लूइन, केप हॉर्न आणि केप ऑफ गुड होप या तिन्ही ग्रेट केप्सना वळसा घालेल. या मोहिमेचं नेतृत्व लेफ्टनंट कर्नल अनुजा वरुडकर यांच्याकडे आहे. या मोहिमेतल्या टप्प्यांविषयी अधिक माहिती देताना त्या म्हणाल्या...**

**ही पूर्ण प्लॅनिंग जी आहे ती आम्ही भागांमध्ये तोडलेली आहे कारण एकवीस हजार सहा शे नॉटिकल माईल खूप मोठा टप्पा आहे म्हणजे ऑस्ट्रेलिया ते न्यूझीलंड न्यूझीलंड ते अर्जेन्टिना अर्जेन्टिना ते केप टाऊन आणि केप टाऊन ते मुंबई प्रत्येक लेगला किती दिवस लागतील कुठले कुठले वेदर पॅटर्न्स आहेत करंटस कुठे लागतील कसं तुम्ही खायचं प्यायचं बघणार आहात तुमच्या वेदरमध्ये जर का कुठलं तूफान आलं किंवा कुठलं वादळ आलं तर त्या वादळामध्ये तुम्ही कसं बिहेव करणार आहात काय काय वट हे रिपे तुम्ही अँटीसिपेट करता तर त्या सगळ्या गोष्टी ज्या आहेत त्या विचार करून आम्ही याच्यामध्ये प्लॅनिंग केलेलं आहे.**

**26 हजार 100 नॉटिकल मैलांपेक्षा जास्त प्रवास करून पुढच्या वर्षी मे महिन्यात मुंबईत परतण्याचं त्यांचं नियोजन आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी, मुंबईहून अंकिता आपटे.**

**जी एस टी**

जीएसटीतल्या दरकपातीनंतर कमी होणाऱ्या दरांची माहिती दुकानात लावण्याच्या सूचना केंद्र सरकारनं विक्रेत्यांना केल्या आहेत. घाऊक तसंच किरकोळ विक्रेते दोघांनाही हे फलक लावावे लागणार आहेत. तसंच जीएसटीच्या संकेतस्थळावरही ही यादी प्रदर्शित करावी लागणार आहे. विविध उद्योग संघटनांच्या बैठकीत केंद्रीय अप्रत्यक्ष कर मंडळानं या सूचना केल्या. दरम्यान जीएसटी प्रणालीतील या सुधारणेचं स्वागत व्यापारी, सामान्य नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर करत आहे. पालघरमधील औषध विक्रेते मनोज मिस्त्री यांची ही प्रतिक्रिया..

**मी मेडिकल औषधाच्या रिलेटिवमध्ये काम करतोय तर जे गव्हर्नमेंटनी जी एस टीचं जे कमी केलेलं आहे मेडिसिनवरती चौतीस मेडिसिनवरती कमी केलेलं आहे त्याच्यामुळे सर्वसामान्यांचा फायदा होणार आहे आणि मेडिकलवाल्यांचा पण फायदा होणार आहे डायबिटीज आहे बी पी आहे नंतर कॉलेस्ट्रॉल आहे हार्टच्या रिलेटेड आहे बाकी इतर मेडिसिन आहे त्याच्यामुळे खूप लोकांना राहत भेटलेली आहे.**

**तपास**

अकोला इथं 2023 मध्ये झालेल्या दंगलीचा तपास करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयानं विशेष तपास पथकाची स्थापना केली आहे. न्यायाधीश न्यायमूर्ती संजयकुमार यांच्या अध्यतेखालील पीठानं हा आदेश दिला.

**क्रिकेट**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेतला भारत-पाकिस्तान सामना रद्द करण्याची मागणी करणारी याचिका काल सर्वोच्च न्यायालयानं फेटाळली. येत्या रविवारी, हा सामना होणार आहे. पहलगाम इथला दहशतवादी हल्ला आणि ऑपरेशन सिंदूरनंतर पाकिस्तान विरुद्ध खेळल्याने राष्ट्रीय प्रतिष्ठेला धक्का बसेल, त्यामुळे हा सामना रद्द करावा अशी याचिका कायद्याचं शिक्षण घेणाऱ्या चार विद्यार्थ्यांनी केली होती. त्यावर तातडीने सुनावणी घ्यायला न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि विजय बिश्नोई यांच्या पीठाने नकार दिला.

**हवामान**

येत्या 24 तासात राज्याच्या सर्वच विभागांमध्ये पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.